# महाराष्ट्र विधानपरिषद

## द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

## मराठवाड्यातील अनेक खाजगी रूग्णालये व पॅथॉलॉजी (लॅब) यांनी रूग्णांची आर्थिक लुट केल्याबाबत

**(१) ८७४६ (१७-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना कालावधीत मराठवाड्यातील अनेक खाजगी रुग्णालये व पॅथॉलॉजी (लॅब) यांना शासकीय दर निश्चित करून दिलेले असतानाही त्याचे पालन न करता लाखो रूपयांची आर्थिक लूट केल्याप्रकरणी त्यांची तपासणी करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी प्रधान सचिव यांच्याकडे ई-मेलव्दारे तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साधे बेड व व्हेंटीलेटर यासाठी जादा दराने आकारणी करणे किंवा इतर खर्च आकारुन मोठ्या प्रमाणात रूग्णांची लूट करणे अशा प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय तसेच, मराठवाड्यातील खाजगी दवाखाने व लॅब यांची शासनस्तरावर विशेष पथकामार्फत ऑडीट करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक जिल्हा प्रशासनाने नियुक्त केलेले नियंत्रण अधिकारी यांनी रूग्णालयांशी संगनमत करुन गैरप्रकार केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने साधे बेड व व्हेंटीलेटर यासाठी जादा दराने आकारणी करणाऱ्या मराठवाड्यातील खाजगी दवाखाने व लॅबवर तसेच स्थानिक जिल्हा प्रशासनाने नियुक्त केलेले नियंत्रण अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१६-०१-२०२४) :** (१) होय.

(२) मराठवाड्यातील खाजगी रुग्णालयांनी केलेल्या आर्थिक लुटीसंदर्भात एकल महिला पुर्नवसन समिती व जन आरोग्य अभियान यांच्याकडून दिनांक २०/१०/२०२३ पर्यंत ८ जिल्हयांमध्ये प्राप्त ७९ तक्रारींची दखल घेऊन त्या संदर्भातील देयकांचे लेखापरिक्षण करुन जादाचे देयके असणाऱ्या ५९ रुग्णालय व लॅबवर कार्यवाही करण्यात आली असून रुपये २,६४,२८२/- इतकी रक्कम रुग्णांस परत करण्यात आली आहे.

(३) व (४) खाजगी रुग्णालयांसाठी कोविड उपचार दर नियंत्रित करण्यासाठी शासनाने दिनांक ३०/०४/२०२०, २१/०५/२०२०, ३१/०८/२०२०, ३०/११/२०२०, १५/१२/२०२०, २७/०२/२०२१, ०१/०६/२०२१, ०४/०८/२०२१ व ०१/०९/२०२१ रोजी अधिसूचना निर्गमित केल्या आहेत.
दर नियंत्रण अधिसूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य स्तरावर सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, जिल्हा स्तरावर (महानगरपालिका क्षेत्र सोडून) जिल्हाधिकारी व महानगरपालिका क्षेत्रामध्ये आयुक्त महानगरपालिका हे सक्षम प्राधिकारी आहेत. शासनाच्या अधिसूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांनी ऑडीट करण्यासाठी विशेष पथके नेमली आहेत.

राज्य स्तरावर सक्षम प्राधिकारी म्हणून प्राधिकृत केलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांनी कोरोना एकल महिला पुनर्वसन समिती व जन आरोग्य अभियान यांच्याकडून दिनांक ३१ जुलै, २०२३ पर्यंत प्राप्त झालेल्या ४८० तक्रारीची दखल घेऊन त्यासंदर्भात बिलांचे लेखापरीक्षण करुन जास्तीची देयके आकारणाऱ्या रुग्णालय व लॅबवर कारवाई करण्याबाबत तसेच रुग्णांना त्यांच्या अतिरिक्त देयकाची रक्कम परत मिळण्याबाबत आवश्यक कार्यवाही होण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांना पत्राद्वारे कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोविड-१९ या साथीच्या आजारात काम केलेल्या आरोग्य सेवकांचे प्रश्न सोडविण्याबाबत

**(२) ९८६५ (१५-०७-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोविड-१९ या महाभयंकर साथीमध्ये राज्यातील बहुतांशी रुग्णालयांमध्ये आरोग्य सेवक म्हणून काम करणाऱ्या परिचारीका, वॉर्डबॉय व आया यांच्यावर अन्याय होत असून रुग्णालय प्रशासनाकडून योग्य वागणूक मिळत नसल्याची अनेक प्रकरणे मागील एक वर्षाच्या काळात निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आरोग्य सेवकांच्या रजा विनावेतन करणे व कर्मचारी आजारी असल्यास रजा नाकारणे याबाबत अधीक्षक व प्रशासकीय अधिकारी हे परिचारीका व इतर कर्मचारी यांचे प्रश्न सोडविण्यासाठी दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोविड-१९ या साथीच्या आजारात तणावाखाली काम करणाऱ्या आरोग्य सेवकांमध्ये नाराजी निर्माण झाली असल्याने याबाबत शासनाने चौकशी करुन आरोग्य सेवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२६-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी कर्मचाऱ्यांवर अन्याय झाल्याच्या तक्रारी प्राप्त नसल्याने स्वतंत्र यंत्रणा उभी करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अड्याळ (ता.पवनी, जि.भंडारा) गावात वीजतांत्रिक मदतनीस उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३) १२४६७ (३०-०३-२०२२) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अड्याळ (ता.पवनी, जि.भंडारा) गावातील पथदिवे बंद असल्याचे ग्रामपंचायत प्रशासनाला कळवूनही पथदिवे सुरु करण्यात येत नसल्याचे, तसेच पथदिव्याची दुरस्ती करण्याकरिता ग्रामपंचायतीकडे एकही वीजतांत्रिक नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावात वारंवार वीज बंद अथवा खराब होत असून वीजतांत्रिक नसल्याने खाजगी व्यक्तिला पैसे देऊन वीज दुरुस्ती/पुरवठा सुरु करण्याचे काम करुन घ्यावे लागत असल्याने गावकऱ्यांना आर्थिक भार सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत ग्रामपंचायतीकडे तक्रार करुनही ग्रामपंचायत प्रशासनाने अद्याप एकाही वीजतांत्रिक मदतनीसाची नियुक्ती केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अड्याळ गावात वीजतांत्रिक मदतनीस उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) ग्रामपंचायत अड्याळ येथील लोकसंख्येनुसार मंजुर आकृतिबंधात वीजतांत्रिक पद नसल्यामुळे रोजंदारीवर मजुरामार्फत पथदिवे लावणे व दुरूस्तीचे काम करून घेतले जात असून त्यासाठी ग्रामनिधीतून मजुरी देण्यात येते.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिखली (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील सरपंच व ग्रामसेवक यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(४) १६५१२ (२८-१२-२०२२) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (ता मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील सरपंच व ग्रामसेवक यांनी गैरव्यवहार केला असल्याने संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करणेबाबत दिनांक १९/०९/२०२२ रोजी तेथील लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) होय,चौकशीअंती चिखली ग्रामपंचायत सरपंच सौ.आशा कांडेलकर यांचेवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८च्या कलम १४(ज-३) प्रमाणे अपात्रतेबाबत कार्यवाही आणि तत्कालीन ग्रामसेवक श्री.राहुल फुलचंद कांबळे याचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ प्रमाणे दोन वेतनवाढ कायमस्वरूपी रोखण्याची शिक्षा बजाविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यातील औरंगाबाद जिल्ह्यासह इतर जिल्हा परिषदेच्या शाळांना मैदाने उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) १७११४ (२५-०३-२०२३) श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच मैदानी खेळाचे धडे मिळावेत याकरीता जिल्हा परिषदेच्या शाळांमार्फत विविध उपक्रम राबविले जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २१३० शाळा असून त्यापैकी १९५० शाळांना खेळाची मैदाने आहेत तर १८० शाळांना खेळासाठी मैदाने नाहीत व वर्गखोल्याही पुरेशा नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही शाळांना मैदाने आहेत परंतु त्यास तारकुंपण / संरक्षक भिंती नसल्याने, मैदानात गुरे ढोरे, शाळेशी संबंध नाही अशा व्यक्ती शाळेतील मैदानात येतात, त्यामुळे सदर शाळांमधील विद्यार्थ्यांना समस्या उद्‌भवत आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने ज्या शाळांना खेळासाठी मैदाने नाहीत अशा जिल्हा परिषदेतील शाळांना मैदाने उपलब्ध करुन देणे व ज्या शाळांना मैदाने आहेत त्या मैदानास संरक्षण भिंती व वर्गखोल्याचे बांधकाम तात्काळ करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२६-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.
(४) औरंगाबाद जिल्ह्यातील ज्या शाळांना मैदान उपलब्ध नाही, अशा शाळांना ग्रामपंचायतींनी मैदानांसाठी मोकळया जागा उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

ज्या शाळांना मैदाने आहेत, परंतु संरक्षण भिंती नाहीत, अशा शाळांना संरक्षण भिंती बांधण्याचे काम महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजनेतुन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच जिल्हा विकास योजना व राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता अभियानातुन वर्गखोल्या बांधकाम करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भद्रकाली (जि.नाशिक) येथील छत्रपती शिवाजी स्टेडिअम येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(६) १८८०३ (०३-०७-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सॅमसन इंडस्ट्रीज प्रा.लि. या प्रोपरायटर कंपनीने (जि.नाशिक) विविध साहित्य पुरवठ्याचा ठेका मिळविण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिक येथे शासकीय शिक्क्याचा व बनावट पुर्वानुभव प्रमाणपत्राचा गैरवापर केला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी जिल्हा क्रीडा अधिकारी, नाशिक यांनी भद्रकाली पोलीस ठाण्यात सॅमसन इंडस्ट्रीज प्रा.लि. या प्रोपरायटर कंपनी (जि.नाशिक) विरोधात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कंपनीने भद्रकाली (जि.नाशिक) येथील छत्रपती शिवाजी स्टेडिअममधील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात दिनांक २३ मार्च, २०२३ ते दिनांक १ एप्रिल, २०२३ या कालावधीत साहित्य पुरवठा करतांना रुपये ९ कोटी २३ लाख एवढ्या रक्कमेचा अपहार केला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने सदरहू कंपनीवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे (२९-०१-२०२४) :** (१) होय.
(२) होय.
(३) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिका यांनी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात सर्व ३१ प्रभागांमध्ये ओपन जिम साहित्य बसविण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द केलेली होती. सदर निविदेमध्ये मे.सेंनसन इंडस्ट्रीज प्रा.लि. नाशिक ऑनलाईन पध्दतीने स्पर्धात्मक निविदेमध्ये सहभाग घेऊन काम मिळविलेले आहे. सदर निविदेमध्ये सहभागी होताना जिल्हा क्रीडा अधिकारी, नाशिक यांचे कार्यालयाचे जा.क्र.१०६९ दिनांक ३१/०१/२०२० चे रुपये ९,२३,०००/-चे काम पूर्णत्व अहवाल प्रमाणपत्र (Work Complition Report) जोडलेले आहे. सदर पूर्णत्व प्रमाणपत्र बनावट असल्याचे क्रीडा अधिकारी, नाशिक यांच्या तपासणीअंती निदर्शनास आले आहे.
(४) याबाबत तत्कालिन जिल्हा क्रीडा अधिकारी, नाशिक यांच्याकडून क्रीडा संचालनालयाने खुलासा घेतला असून त्यानुसार मे. सॅनसन इंडस्ट्रीज प्रा.लि. यांनी स्वतः च्या लाभाकरिता खोटे प्रमाणपत्र तयार करणे व शासकीय मोहोरचा गैरवापर करुन, त्याचा स्वत: च्या लाभाकरिता वापर केल्याने शासनाची

फसवणूक करणे यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी,नाशिक यांनी मे. सॅनसन इंडस्ट्रीज प्रा.लि. नाशिक यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात "आरोग्य हक्क" कायदा तयार करणेबाबत

**(७) १९०५२ (०८-०८-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजस्थान शसनाने नुकताच आरोग्य हक्क कायदा केला असून या कायद्यानुसार विशिष्ट प्रकारच्या वैद्यकीय तातडीच्या परिस्थितीमध्ये खासगी डॉक्टरांनी प्राथमिक तातडीची वैद्यकीय सेवा देणे व योग्य ठिकाणी रुग्णाला पाठवणे बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी रुग्ण शुल्क भरु शकत नसेल तर शासनाने त्याचा परतावा देणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राजस्थान शासनाच्या धर्तीवर आरोग्य हक्क कायद्याची माहिती घेऊन सदरील कायदा राज्यात लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२९-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) राजस्थान राज्यातील "आरोग्य हक्क" कायद्याचे अवलोकन केले असता, याबाबत कायद्यामध्ये तरतूद नसल्याचे दिसून येत आहे.
(३) राजस्थान राज्याच्या धर्तीवर आरोग्य हक्क कायद्याचा मसुदा तयार करण्यात आला असून विधी व न्याय विभागाकडे तपासण्यासाठी पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात रुग्णांचे प्रश्न सोडविण्यासाठी तक्रारनिवारण कक्ष स्थापन करणेबाबत

**(८) १९०५५ (०८-०८-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेत रुग्णांच्या आरोग्य विषयक तक्रारींचे निरसन करण्यासाठी तक्रारनिवारण कक्ष असणे कायद्याने बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात केवळ १५ ठिकाणीच असा कक्ष स्थापन करण्यात आला असून त्यातून आरोग्य यंत्रणेची अनास्था दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदरील कक्ष राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (११-०१-२०२४) :** (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र शुश्रृषागृह नोंदणी (सुधारित) नियम, २०२१ नुसार खालीलप्रमाणे स्थानिक पर्यवेक्षी प्राधिकारी रुग्णालयांची नोंदणी करतात.

१. महानगरपालिका क्षेत्र - वैद्यकिय आरोग्य अधिकारी, मनपा.

२. नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्र - जिल्हा शल्य चिकित्सक.

३. ग्रामीण (जि.प.क्षेत्र) - जिल्हा आरोग्य अधिकारी.

४. कटक क्षेत्र - वैद्यकिय अधिकारी कटक क्षेत्र.

हे पर्यवेक्षी प्राधिकारी प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करुन योग्य ती पुढील कार्यवाही करतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विविध जिल्ह्यात शासकीय रुग्णालयांची संख्या वाढविणे व रुग्णांसाठी खाटा उपलब्ध करुन देणेबाबत

**(९) १९१५६ (०८-०८-२०२३) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जागतिक आरोग्यसेवेच्या निकषानुसार ४० लोकसंख्येमागे रुग्णालयात एक खाट असणे आवश्यक असूनही राज्यात ४ हजार २६४ लोकांमागे फक्त एकच खाट उपलब्ध असल्याची बाब निदर्शनास आली आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी राज्यात आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यावर रुग्णांची अतिशय गैरसोय होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन राज्यातील विविध जिल्ह्यात शासकीय रुग्णालयांची संख्या वाढविणे व तेथे रुग्णांसाठी अधिकाधिक खाटा उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०१-२०२४) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) जिल्हयांकडून प्राप्त प्रस्तावांवर निकषांची पडताळणी करुन आरोग्य संस्थेचे श्रेणीवर्धन करण्यात येते तसेच लोकप्रतिनीधी व इतर मान्यवरांकडून मागणी करण्यात आल्यानुसार विशेष बाब म्हणून आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात खाजगी आरोग्यसेवेचे प्रमाणीकरण करुन वैद्यकीय आस्थापना कायदा करण्याबाबत

**(१०) १९१८२ (०८-०८-२०२३) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ९० टक्क्यांहून अधिक डॉक्टर खासगी व्यवसाय करीत असतानाही खासगी आरोग्यसेवेचे प्रमाणिकरण झालेले नाही, त्यामुळे रुग्णांना अनेकदा दर्जेदार सुविधा सुयोग्य दरात मिळत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे मागील अनेक वर्षापासून राज्यात वैद्यकीय आस्थापना कायदा करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने खासगी आरोग्य सेवेचे प्रमाणिकरण व राज्यात वैद्यकीय आस्थापना कायदा करणे या दोन्ही मागण्यांवर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२९-१२-२०२३) :** (१) (२) व (३) राज्य शासनाने महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम, १९७३ मध्ये दिनांक १४/०१/२०२१ च्या अधिसूचनेन्वये सुधारणा करुन महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारीत) नियम, २०२१ प्रसिध्द केले आहेत. त्यामध्ये रुग्ण हक्क संहिता, शुश्रुषागृहांसाठी किमान प्रमाणकांचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. सदर नियमांमुळे केंद्र शासनाच्या क्लिनिकल इस्टॅब्लिशमेंट ॲक्ट, २०१० मधील उद्देश साध्य होत असल्याने राज्यात नव्याने क्लिनिकल इस्टॅब्लिशमेंट ॲक्ट लागू करण्याची बाब विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई परिसरातील माथाडी कामगारांच्या गृहनिर्माणासाठी दिलेल्या शासकीय भूखंडावरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(११) १९४९४ (०८-०८-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सह्याद्रीनगर, चारकोप, कांदिवली येथील माथाडी कामगारांच्या गृहनिर्माणासाठी दिलेल्या सुमारे २८ एकर खुल्या भूखंडापैकी आठ एकर खुल्या शासकीय भूखंडावर होत असलेल्या अतिक्रमणाची शासनाने दखल घेऊन कारवाई करण्यात येत आल्याची बाब माहे मे, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने सर्व अतिक्रमणे काढून टाकण्याचे आदेश कापड बाजार आणि दुकाने मंडळाच्या उपायुक्तांना दिले असून अन्यथा अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अतिक्रमण विभागाने नोटीस जारी केली आहे काय, या नोटिशीत कारवाईचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर माथाडी कामगारांकरिता घरे बांधण्याठी दिलेल्या २८ एकर जागेपैकी निष्कासित झालेले आठ एकर खुले शासकीय भूखंड माथाडी कामगारांना उपलब्ध करुन तात्काळ घरे बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१६-०१-२०२४) :** (१), (२) व (३)

माथाडी कामगारांच्या गृहनिर्माणासाठी शासनाने दिलेल्या भुखंडामध्ये बांधण्यात आलेल्या ३२ इमारतींच्या परिसरामध्ये व खुल्या सात एकर भुखंडावर झालेले अतिक्रमण हटवावे, असे निर्देश मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक ०८/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये उप आयुक्त, कापड बाजार आणि दुकाने मंडळ यांना दिले होते.

कापड बाजार आणि दुकाने मंडळामार्फ़त बृहन्मुंबई महानगरपालिका,आर/साऊथ वार्ड,कांदिवली व पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त सहकार्याने दिनांक १०/०४/२०२३ रोजी अतिक्रमण हटविण्यात आले आहे.

(४) चारकोपर, कांदिवली, सह्याद्रीनगर येथील ०७ एकर खुल्या शासकीय भुखंडावर माथाडी कामगारांकरिता घरे बांधण्याकरिता वास्तुविशारदाची नेमणूक केली असून त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेला बांधकामाचे आराखडे सादर केले आहेत.

दरम्यानच्या काळात बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर ०७ एकर जागेवर आरक्षण दाखविले असून सदर आरक्षण महानगरपालिकेने दवाखाना,शाळा, मोकळे मैदान, खेळण्याचे मैदान,रस्ता,बहुउद्देशीय समाज कल्याण इ. कारणास्तव प्रस्तावित केले आहे.याबाबत कापड बाजार आणि दुकाने मंडळाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे आक्षेप नोंदविला होता.तथापि,नगरविकास विभागाने सदरचे आरक्षण वगळण्यास मंजुरी दिलेली नाही.त्यामुळे पुढील कार्यवाही करणे शक्य झाले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथे स्थलांतरित करण्यात आलेले फुटबॉल केंद्र कोल्हापूर येथे सुरु करण्याबाबत

**(१२) १९७१३ (०८-०८-२०२३) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोल्हापूर येथील शिवाजी स्टेडिअममधील क्रिडा प्रबोधिनीमध्ये सुरु असलेले फुटबॉलचे केंद्र राज्य शासनाने २२ वर्षापूर्वी कोणतीही पूर्वसूचना न देता पुणे येथे स्थलांतरित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर केंद्र पुन्हा कोल्हापूर येथे सुरु करण्याची मागणी खेळाडू, पालक आणि फुटबॉल प्रेमींकडून होवू लागली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने सदरील केंद्र पुन्हा कोल्हापूर येथे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे (२९-०१-२०२४) :** (१) होय,

सन २००० मध्ये सोयी अभावी फुटबॉल खेळाची क्रीडा प्रबोधिनी शिवछत्रपती क्रीडासंकुल, पुणे येथे स्थलांतरीत करण्यात आलेली आहे.
(२) होय
(३) क्रीडा प्रबोधिनीचे व्यवस्थापन नियोजनाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उच्चस्तर धोरण समिती गठीत करण्यात आली आहे. कोल्हापूर येथे फुटबॉल खेळाची प्रबोधनी सुरु करताना आवश्यक सोयी सुविधा जसे कायमस्वरुपी फुटबॉल खेळासाठी मानकानुसार दर्जेदार क्रीडांगण आवश्यक आहे. ते प्रबोधिनीच्या खेळाडूकरिता सकाळ व सायंकाळ नियमित दैनंदिन सरावासाठी कायमस्वरुपी उपलब्ध असणे आवश्यक आहे. तसेच खेळाडूंना प्रबोधिनीत सुयोग्य निवास व्यवस्था, शैक्षणिक सुविधा इ. सुविधा उपलब्ध करणे अत्यंत आवश्यक आहे. या सर्व सोयी सुविधा कोल्हापूर येथे उपलब्ध झाल्यास प्रस्तुत प्रकरणी उच्चस्तर धोरण समितीच्या निर्णयानुसार कार्यवाही करता येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये स्थापत्य अभियंत्यांची पदनिर्मीती करण्याबाबत

**(१३) १९८६४ (०८-०८-२०२३) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामपंचायतींचा आकृतिबंध सन २००० मध्ये वा त्यादरम्यान तयार करण्यात आलेला असून अद्यापी तो अद्यावत केलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास गावांची वाढती लोकसंख्या व त्याचे शहरीकरण लक्षात घेता १० हजार लोकसंख्येच्या पुढील ग्रामपंचायतींना बांधकाम परवाने, अनधिकृत बांधकाम, बांधकामांचा दर्जा यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या शाखा अभियंत्यावर अवलंबुन रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास मोठ्या ग्रामपंचायतीतील विविध योजना, विकास कामे, शहरीकरण त्याचे नियोजन यांचा विचार करता मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये स्वतंत्र स्थापत्य अभियंत्याची गरज लक्षात घेता १० हजार लोकसंख्येच्या पुढील ग्रामपंचायतीमध्ये स्थापत्य अभियंत्याची पदनिर्मिती करण्यासंदर्भात शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०९-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हा सेवा संवर्गातील स्थापत्य अभियांत्रिकी सहायक शाखा अभियंता यांच्या सेवा मोठ्या ग्रामपंचायतींमधील कामांसाठी उपलब्ध करून दिल्या जातात.
(३) मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये स्थापत्य अभियंत्यांची पदनिर्मिती करण्याची बाब धोरणात्मक स्वरूपाची असून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध सुधारीत करण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## मुक्ताईनगर, बोदवड, रावेर (जि.जळगांव) येथील पंचायत समिती अंतर्गत असलेल्या विविध संवर्गातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया राबविण्याबाबत

**(१४) २०१३२ (०८-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर, बोदवड, रावेर (जि.जळगांव) येथील पंचायत समिती अंतर्गत गट विकास अधिकारी, कृषी विस्तार अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, ग्रामसेवक, गट शिक्षण अधिकारी, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, उपशिक्षक अशी अनेक पदे रिक्त आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे नागरिकांना तसेच प्रशासनास समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर पंचायत समिती अंतर्गत असलेली रिक्त पदे तातडीने भरण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१३-१२-२०२३) :** (१), (२), (३) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथे दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या आदेशान्वये गट विकास अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली असून बोदवड (जि.जळगांव) येथील पंचायत समिती अंतर्गत गट विकास अधिकारी हे पद सद्य:स्थितीत रिक्त आहे. पंचायत समिती, बोदवड येथील दोन कृषी विस्तार अधिकारी यांची पदे रिक्त असून पंचायत समिती, मुक्ताईनगर येथील ग्रामसेवकांच्या मंजूर ४३ पदांपैकी १३ पदे, पंचायत समिती, बोदवड येथील मंजूर २५ पदांपैकी ७ पदे तर पंचायत समिती, रावेर येथील एकूण ६४ मंजूर पदांपैकी १४ पदे रिक्त आहेत. मुक्ताई नगर, बोदवड, रावेर तालुक्यातील गट शिक्षणाधिकारी या संवर्गाची २ पदे, विस्तार अधिकारी संवर्गाची ७ पदे, केंद्र प्रमुख संवर्गाची २३ पदे, ग्रेडेड मुख्याध्यापक संवर्गाची २६ पदे व उपशिक्षक संवर्गाची २९४ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला असून वर्ग ३ ची शिक्षक संवर्ग वगळता इतर संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई श्रमिक संघ यांच्याकडे ‘वार्षिक विवरण नमुना’ सादर न केलेल्या कामगार संघटनांची मान्यता रद्द करणेबाबत

**(१५) २०५१२ (०८-०८-२०२३) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या श्रमिक संघ अधिनियम १९२६ च्या कलम – २८ व मुंबई श्रमिक संघ विनियम १९२७ च्या नियम १७ (१) अन्वये कामगार संघटनेचे वार्षिक विवरण नमुना आय मध्ये प्रत्येक वर्षाच्या ३० एप्रिलपर्यंत उपनिबंधक श्रमिक संघ, मुंबई यांना सादर करणे बंधनकारक आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२१-२०२२ मध्ये राज्य शासनाच्या माथाडी व सुरक्षारक्षक मंडळातील नोंदीत असलेल्या माथाडी कामगारांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व मुंबई श्रमिक संघ यांच्या कार्यालयात नोंदीत असलेल्या किती व कोणत्या माथाडी व सुरक्षारक्षक कामगार संघटनांनी उपनिबंधक, श्रमिक संघ मुंबई यांच्याकडे ‘वार्षिक विवरण नमुना’ सादर केला आहे,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत वार्षिक विवरण नुमना सादर न केलेल्या माथाडी व सुरक्षारक्षक कामगार संघटनांची मान्यता रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२९-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०२१ व सन २०२२ करिता वार्षिक विवरणपत्र नमुना-आयमध्ये सादर केलेल्या ५५ संघटना खालीलप्रमाणे आहेत.

१) अखिल भारतीय माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन,

२) अखिल भारतीय माथाडी आणि ट्रान्सपोर्ट युनियन,

३) महाराष्ट्र माथाडी श्रमजिवी कामगार जनरल युनियन,

४) महाराष्ट्र राज्य कापड आणि माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन,

५) महाराष्ट्र माथाडी जनरल कामगार युनियन,

६) महाराष्ट्र राज्य माथाडी आणि जनरल कामगार संघटना,

७) महाराष्ट्र राज्य माथाडी आणि गुमास्ता कामगार संघटना,

८) महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजिवी कामगार संघटना,

९) अखिल महाराष्ट्र माथाडी ट्रान्सपोर्ट ॲण्ड जनरल कामगार युनियन,

१०) कोकण श्रमजिवी माथाडी व जनरल कामगार युनियन,

११) महाराष्ट्र माथाडी गुमास्ता आणि सर्व श्रमिक जनरल कामगार युनियन,

१२) महाराष्ट्र नवनिर्माण माथाडी कामगार सेना,

१३) राष्ट्रीय माथाडी गुमास्ता आणि जनरल कामगार युनियन,

१४) महाराष्ट्र राज्य माथाडी आणि जनरल कामगार सेना,

१५) महाराष्ट्र शिव माथाडी कामगार सेना,

१६) ऑल इंडिया लेबर माथाडी जनरल युनियन,

१७) महाराष्ट्र राज्य माथाडी आणि जनरल कामगार युनियन,

१८) श्री एकात्मता माथाडी कामगार युनियन,
१९) महाराष्ट्र शिवशाही माथाडी आणि जनरल कामगार युनियन,
२०) जय महाराष्ट्र माथाडी, ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार सेना,
२१) महाराष्ट्र पाताळगंगा माथाडी व जनरल कामगार युनियन,
२२) महानगर सुरक्षा रक्षक आणि माथाडी जनरल कामगार युनियन,
२३) विकासरत्न छत्रपती अभयसिंग राजे भोसले महाराष्ट्र राज्य माथाडी कागद आणि जनरल कामगार युनियन,
२४) दिघी पोर्ट स्थानिक कंत्राटी कामगार सुरक्षा रक्षक कागद आणि जनरल कामगार युनियन,
२५) दिधी पोर्ट स्थानिक कंत्राटी कामगार, सुरक्षा रक्षक, माथाडी व चालक मालक वाहतूक संघटना
२६) दिपक भाऊ निकाळजे माथाडी आणि जनरल कामगार युनियन,
२७) शिवगर्जना माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार सेना,
२८) तरूण माथाडी ट्रान्सपोर्ट आणि आणि जनरल कामगार संघटना,
२९) महाराष्ट्र राज्य माथाडी आणि जनरल कामगार सेना,
३०) द महाराष्ट्र सुरक्षा रक्षक माथाडी आणि जनरल कामगार संघटना,
३१) भारतीय सुरक्षा रक्षक युनियन,
३२) सुरक्षा रक्षक ॲण्ड जनरल कामगार सेना,
३३) सुरक्षा रक्षक कामगार युनियन,
३४) महाराष्ट्र सुरक्षा रक्षक आघाडी,
३५) कामगार सुरक्षा संघ,
३६) राष्ट्रवादी सुरक्षा रक्षक आणि जनरल कामगार युनियन,
३७) नव महाराष्ट्र सुरक्षा रक्षक आणि जनरल कामगार युनियन,
३८) महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन,
३९) भारतीय सुरक्षा सक्षक युनियन,
४०) सुरक्षा रक्षक ॲण्ड जनरल कामगार सेना,
४१) सुरक्षा रक्षक कामगार युनियन, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक आघाडी,
४२) कामगार सुरक्षा संघ,
४३) राष्ट्रवादी सुरक्षा रक्षक आणि जनरल कामगार युनियन, मुंबई,
४४) शिव सुरक्षा रक्षक सेना,
४५) नव महाराष्ट्र सुरक्षा रक्षक आणि जनरल कामगार युनियन,
४६) महाराष्ट्र राज्य गुमास्ता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन,
४७) साहेब माथाडी कामगार सेना,
४८) महाराष्ट्र श्रमिक नवयुवक माथाडी युनियन,
४९) रिपब्लिकन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार सेना,
५०) हिंदुस्थान माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार सेना,
५१) शिवशाही माथाडी आणि जनरल कामगार सेना,
५२) स्वराज्य माथाडी व जनरल कामगार आणि वाहतूक संघटना,

५३) श्रमिक चळवळ कामगार संघटना,
५४) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) माथाडी आणि जनरल कामगार संघटना व
५५) ऑल इंडिया माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियन.
(३) श्रमिक संघ अधिनियम, १९२६ च्या कलम १०(अ) नुसार कामगार संघटनांची नोंदणी करण्यात येते व कलम १० (ब) नुसार नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येते. मात्र संघटनांना मान्यता देणे किंवा रद्द करण्याची कार्यवाही महाराष्ट्र कामगार संघटनांना मान्यता देणे व अनुचित प्रथा प्रकार प्रतिबंध अधिनियम, १९७१ अंतर्गत करण्यात येते. त्यास अनुसरुन माथाडी व सुरक्षा रक्षक यांच्या सुमारे २४४ संघटना नोंदणीकृत आहेत. त्यापैकी १९ संघटनांनी नमुना आय मध्ये सन २०२१ व सन २०२२ (जानेवारी ते डिसेंबर) या वर्षाकरिता वार्षिक विवरणपत्र विहित नमुन्यात सादर केलेले असून उर्वरित २२५ संघटनांना कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आली आहे. त्यापैकी ५५ संघटनांनी वार्षिक विवरणपत्र विहित नमुन्यात सादर केले आहे. तद्नंतर १७० संघटनांपैकी ११ संघटनांची नोंदणी रद्दबातल करण्यात आलेली असून उर्वरित १५९ संघटनांवर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे देगांव (ता.जि.सातारा) येथील शेतकऱ्यांच्या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे शिक्के उठविणेबाबत

**(१६) २०५८४ (०४-०८-२०२३) श्री.शशिकांत शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १७४०४ ला दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे देगांव (ता.जि.सातारा) येथील शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, सातारा या महामंडळाचे शिक्के आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ७/१२ उताऱ्यावर महामंडळाचे शिक्के असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचे आर्थिक व्यवहार करता येत नाहीत, त्यामुळे ७/१२ वरील शिक्के उठविण्याबाबत शासनाने दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी अधिसूचना काढूनसुध्दा अद्याप शिक्के उठविण्यात आले नाहीत,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मौजे देगांव येथील अधिसूचित खाजगी ३५२.३१ हे.आर क्षेत्र विनाअधिसूचित करण्यास उच्चाधिकार समितीने दिनांक १४/०७/२०२२ रोजी तत्वत: मान्यता दिली असूनही सदर ७/१२ उताऱ्यावरील महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने अद्यापही शिक्के उठविले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०८-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) दिनांक १४/०७/२०२२ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत मौजे देगांव (ता.जि.सातारा) येथील ३५२.३१ हे.आर खाजगी क्षेत्र विनाअधिसूचित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने सदर क्षेत्र विनाअधिसूचित करण्याबाबत मऔवि महामंडळाने सादर केलेल्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली. या अनुषंगाने दिनांक ३ मार्च,२०२३ रोजी अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

तसेच यानुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## राज्यातील रुग्णालयांच्या पुनर्नोंदणी नियमांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१७) २०६१३ (०८-०८-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रुग्णहक्क आणि डॉक्टरांना संरक्षण देण्यासाठी क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट लागू होणार असून यासंदर्भात नवीन नोंदणी नियमावलीमध्ये खासगी डॉक्टरांच्या रुग्णालयांना पुनर्नोंदणी देताना रुग्णालय क्षेत्रफळासाठी विहित निकष ठरवून देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक रुग्णालये जुनी असून त्यांना या निकषांची पूर्तता करणे शक्य नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे या रुग्णालांना जागेच्या उपलब्धते संदर्भातील निकष लागू न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२९-१२-२०२३) :** (१), (२) व (३) राज्य शासनाने महाराष्ट्र सुश्रुषागृह नोंदणी नियम, १९७३ मध्ये दिनांक १४/०१/२०२१ च्या अधिसूचनेन्वये सुधारणा करून महाराष्ट्र सुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम, २०२१ प्रसिध्द केले आहेत. त्यामध्ये रूग्ण हक्क संहिता, सुश्रुषागृहांसाठी किमान प्रमाणकांचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. सदर नियमांमुळे केंद्र शासनाच्या क्लिनिकल इस्टॅब्लिशमेंट ॲक्ट, २०१० मधील उद्देश साध्य होत असल्याने राज्यात नव्याने क्लिनिकल इस्टॅब्लिशमेंट ॲक्ट लागू करण्याची बाब विचाराधिन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यावरील कर्जभार कमी करण्याबाबत

**(१८) २१३३८ (०४-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने विद्यमान आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीमध्ये (ऑक्टोबर ते डिसेंबर,२०२३) मध्ये रोखे बाजारातून २२ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यमान आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन तिमाहीमध्ये राज्य शासनाने एकूण ४५ हजार कोटीचे कर्ज घेतले असून तिसऱ्या तिमाहीचा कर्जाचा भार ६७ हजार कोटीवर पोहचणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाला टक्केवारीनुसार किती कर्जभार घेण्याची मुभा आहे तसेच राज्य शासनावर होत असलेला कर्जभार कमी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अजित पवार (०५-०२-२०२४) :** (१) व (२) विधानमंडळाने पारित केलेल्या अर्थसंकल्पानुसार आणि केंद्र शासनाने भारतीय राज्यघटनेच्या कलम २९३(३) अन्वये विहित केलेल्या मर्यादेनुसार राज्य शासन विकास कामांसाठी आवश्यकतेनुसार कर्ज उभारणी करते.
(३) राज्य शासनास स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३% मर्यादेत कर्ज उभारण्याची मुभा आहे. त्यानुसार वरील मर्यादेत कर्ज उभारण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी लागू असलेल्या स्वयंम योजनेतील जाचक अटीमध्ये सुधारणा करण्याबाबत

**(१९) २१४६१ (२४-११-२०२३) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंम योजना शासनाने आणली असून यामध्ये केवळ महानगरे, विभागीय शहरे व जिल्हास्तरावरील शैक्षणिक संस्थांमधील शासकीय व अनुदानित कॅालेजेस मध्ये “भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट लाभ” दिला जातो,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासीना ते धनगरांना असा शासन निर्णय झालेला असताना सदर योजनेत आदिवासीना तालुकास्तर व महानगरपालिका /नगरपालिका हद्दीपासून ५ किमी परिसरापर्यंतच्या विद्यार्थ्यांना हा लाभ दिला जातो तर धनगर समाजासाठी लागू असणाऱ्या स्वयंम योजनेमध्ये तालुकास्तर व महानगरपालिका/नगरपालिका हद्दीपासून ५ किमी परिसरापर्यंत असणाऱ्या विद्यार्थ्यांना हा लाभ दिला जातं नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धनगर समाजासाठी लागू असणाऱ्या स्वयंम योजनेचा लाभ आदिवासी साठी लागू असणाऱ्या स्वयंम योजनेप्रमाणे देण्याची मागणी धनगर समाजातील विध्यार्थ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अतुल सावे (०८-१२-२०२३) :** (१) होय
(२), (३), (४) व (५) वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी विविध विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांमध्ये एकसमानता आणण्याचा निर्णय, शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक ३०/१०/२०२३ अन्वये शासनाने घेतला असून त्यानुषंगाने धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या 'स्वयंम' योजनेमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात येत आहेत.

---

## अकोला जिल्ह्यातील जलसिंचनांच्या प्रकल्पांबाबत

**(२०) २१५०१ (०४-०१-२०२४) श्री.विप्लव बाजोरिया, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील पुर्णा बॅरेज, कवठा बॅरेज, उमा बॅरेज, वाई धरण, शहापुर बृहत धरण, नया अंदुरा प्रकल्प, पोपटखेड, शहापुर, कवठा शेलु, काटीपाटी बॅरेज या प्रकल्पाबद्दल तत्कालीन जलसंपदा मंत्री यांच्या समवेत दिनांक ०९/०८/२०२० रोजी माजी लोकप्रतिनिधींनी विनंती केलेल्यानुसार बैठक घेण्यात आली असून सदर बैठकीमध्ये उपरोक्त सर्व प्रकल्पांची कामे ९५ टक्केच झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) राज्यात अकोला जिल्ह्यातील खार पाणपट्ट्यात गोड्या पाण्यासाठी बॅरेज ची श्रृंखला करण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या कामासाठी शेकडो कोटी रुपये मंजूर करून ही कामे अद्याप अपूर्ण असल्याची बाब माहे ऑगस्ट २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्रलंबित प्रकल्प पूर्ण करून अकोला जिल्ह्याला याचा लाभ मिळण्याबाबत तसेच वर्षानुवर्षे प्रकल्प रखडवणाऱ्या कत्रांटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०२४) :** (१) होय खरे आहे.

अकोला जिल्ह्यातील जलसिंचनाची अपूर्ण असलेली प्रकल्प पूर्ण करणे मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९/०८/२०२० रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीच्या अनुषंगाने अकोला जिल्ह्यातील एकूण चार (कवठा बॅरेज, कारंजा रमजानपूर, वाई संग्राहक व शहापूर) लघु प्रकल्पांची कामे जवळपास ९५% पूर्ण झाली होती. सदर ४ लघु प्रकल्प सद्य:स्थितीत भौतिकदृष्ट्या पूर्ण झाले आहेत. उर्वरित ६ प्रकल्पांपैकी १ प्रकल्प (काटीपाटी बॅरेज संग्राहक ल.पा.यो.) अद्याप सुरु झाला नसून इतर ५ प्रकल्पांचे नियोजनानुसार काम सुरु आहे.
(२) हे खरे नाही.

अकोला जिल्ह्यातील खारपाणपट्ट्यातील घुगशी बॅरेज, पूर्णा बॅरेज-२, उमा बॅरेज, कवठा बॅरेज, काटीपाटी बॅरेज व काटेपूर्णा असे एकूण ६ प्रकल्प बांधकामाधीन आहेत. वरील प्रकल्पांपैकी कवठा बॅरेज

प्रकल्प भौतिकदृष्ट्या पूर्ण झाला असून घुगशी बॅरेज प्रकल्पामध्ये सुमारे ९० टक्के सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे. तसेच एकूण २ प्रकल्पांचा (पुर्णा बॅरेज-२ व कवठा बॅरेज लघु) पाणीसाठा निर्मित करण्यात आला आहे.

काटेपूर्णा बॅरेज प्रकल्पाचे प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव रुपये ५३३.८१कोटी किमतीस शासन निर्णय दिनांक २०/०५/२०२१ रोजी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. प्रकल्पाची घळभरणी जून, २०२४ मध्ये करण्याचे प्रयोजन असून सिंचन क्षमता निर्मितीसह प्रकल्प पूर्णत्वाचे नियोजन जून, २०२५ अखेर प्रस्तावित आहे. अकोला जिल्ह्यातील विविध प्रकल्पांच्या २१८५६ हेक्टर सिंचन क्षमतेपैकी ५४३१ हेक्टर सिंचन क्षमता तसेच ८३.८१ दलघमी पाणीसाठ्यापैकी ५२.७७ दलघमी पाणीसाठा जून,२०२३ अखेर निर्मित झाला आहे.

(३) उमा बॅरेज मध्यम प्रकल्प बांधकामाची कंत्राटदाराने अपेक्षित प्रगती न राखल्याने सदर कामाचे करारनामे विखंडीत करुन संबंधित कंत्राटदारावर दिवाणी दावे दाखल करण्यात आले आहेत. इतर प्रकल्पांच्या बाबतीत मुख्यत्वे संकल्पनातील तांत्रिक अडचणी, भूसंपादन व पुनर्वसन प्रकरणी उद्भवलेल्या अडचणी इ. मुळे प्रकल्प प्रलंबित राहिले आहेत.

अकोला जिल्ह्यातील कामे प्रगतीपथावर असलेले सिंचन प्रकल्प विहित वेळेत पूर्ण होण्याकरिता आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.